# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट :- ३९०/२०२३ दिनांक – ०४/११/२०२३

## जबरी चोरी करणा-या चोरटयाला अटक करुन ७ गुन्हयांची उकल, मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेची कारवाई.

विरार पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील फिर्यादी श्री जितेंद्र कांतीलाल कंटालिया, वय- ४२ वर्षे, व्यवसाय- नोकरी, रा. रुमनं एजी१, रिषभ दर्शन अपार्टमेंन्ट, एम.बी.इस्टेट, विरार पश्चिम, ता. वसई, जि. पालघर हे पहाटे पायी चालत जात असताना त्याचे हातातील विवो व्हि २७ कपंनीचा मोबाईल पल्सर गाडीवरील दोन अनोळखी इसमांनी जबरीने खेचुन मोटर सायकलवरुन विरार पुर्व कडील दिशेने पळुन गेले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ८६९/२०२३ भा.द.वि.क ३९२, ३४ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

मिरा - भाईंदर, वसई – विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत जबरी चोरी होण्याच्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत असल्याने त्यांना प्रतिबंध करणाच्या अनुषंगाने व दाखल गून्हयांची उकल करण्याबाबत वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे वर नमुद दाखल जबरी चोरीच्या गुन्हयाचा समांतर तपास मध्यवर्ती गुन्हे शाखा करत होती.

त्याअनुषंगाने स.पो.नि.दत्तात्रय सरक व स्टाफ असे घटनास्थळ व घटनास्थळाचे आजुबाजुच्या परिसरात आरोपीचा शोध घेत असताना पो.हवा.शिवाजी पाटील यांना बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मोबाईल फोन चोरी करणारा एक इसम नालासोपारा पुर्व, बिलालपाडा, ओम साई नगर समोरील मैदानात चोरीचे मोबाईल फोन विक्री करत आहे. सदर मिळालेल्या माहितीच्या आधारे नमुद ठिकाणी दिनांक ०३/११/२०२३ रोजी सापळा रचुन इसम नामे सलमान तबारक खान, वय २१ वर्ष, राह. रुम नं ७, हाजी चाळ, रफिक कम्पाउण्ड, वाकणपाडा, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर यास शिताफिने ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास केला असता त्याने वर नमुद गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याचेकडे अधिक तपास केला असता त्याने चोरी केलेले पाच मोबाईल फोन व दोन गॅस बाटले असा एकुण ५६,५००/- रुपये किंमतीचा मुददेमाल त्याचेकडुन जप्त करण्यात आला आहे. मिरा - भाईंदर, वसई - विरार पोलीस आयुक्तालयातील खालीलप्रमाणे एकुण ७ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

- उघडकीस आलेले गुन्हे -

| अ क्र | पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर |
|---|---|
| १ | विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ८६९/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ |
| २ | विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ९११/२०२२ भा.द.वि.सं. कलम ३९२, ३४ |
| ३ | विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ४०३/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३८० |
| ४ | पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं २३२/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३८० |
| ५ | पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ९७९/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३८० |
| ६ | पेल्हार पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ९८१/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३८० |
| ७ | तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि नं ७५२/२०२३ भा.द.वि.सं. कलम ३८० |

सदरची कारवाई श्री. अविनाश आंबुरे, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे) व श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पो.नि. राहुल राख, स.पो.नि.दत्तात्रय सरक, स.पो.उनि. श्रीमंत जेधे, संतोष चव्हाण, पो.हवा. गोविंद केन्द्रे, शिवाजी पाटील, महेश वेल्हे, सतिश जगताप, हनुमंत सुर्यवंशी, मसुब जवान सचिन चौधरी यांनी केलेली आहे.